# घटक २१ – केंद्र - राज्य संबंध

भाग = ३

① कायदेविषयक संबंध
② प्रशासकीय संबंध
③ आर्थिक संबंध.

१) कायदेविषयक -

भाग - ११ व कलम २४५ ते २५५.

① केंद्रीय आणि राज्य कायद्यांचा क्षेत्रीय विस्तार

* संसद — संपूर्ण देशासाठी / काही भागासाठी कायदे करू शकते.
भारतीय क्षेत्रात राज्ये, संघराज्य प्रदेश व तात्पुरते समाविष्ट क्षेत्र

* राज्यविधीमंडळ – संपूर्ण राज्यासाठी किंवा राज्याच्या काही भागासाठी

* विशिष्ट परिस्थितीत संसद आपल्या प्रादेशिक क्षेत्राबाहेरही कायदे करू शकते.
जगातील कुठल्याही भागात भारतीय नागरिकांना व त्यांच्या मालमत्तांना लागू.

संसदेच्या क्षेत्रीय अधिकारावर बंधने:

* अंदमान आणि निकोबार बेटे, लक्षद्वीप, दादरा आणि नगर हवेली व दमण आणि दिव
या चार संघराज्य प्रदेशासाठी राष्ट्रपती नियम करू शकतात. या नियमाने संघराज्य
प्रदेशापुरत्या संसदेच्या कायद्यात दुरुस्त्या करता येतात, रद्द करता येतात.

* राज्यातील अनुसूचित क्षेत्रात संसदेचा कायदा लागू होणार नाही असा आदेश देण्याचा
अधिकार राज्यपालाला.

* राज्यातील आदिवासी क्षेत्राला लागू होणार नाही असा अधिकार आसामच्या राज्यपालाला
(मेघालय, त्रिपुरा, आणि मिझोराम च्या बाबतीत राष्ट्रपतीला)

② कायद्याच्या विषयांची विभागणी

* सातव्या परिशिष्टात सूची १, (केंद्राचे विषय), सूची २ (राज्यांचे विषय) सूची ३ (समवर्ती)

→ केंद्र सूचीतील विषयावर कायदे करण्याचा अधिकार – केंद्राला.
संरक्षण, बँक व्यवहार, परराष्ट्र व्यवहार, चलन, आण्विक उर्जा, विमा, दळणवळण, आंतरराज्यीय
व्यापार, जनगणना, लेखापरिक्षण.

सुरुवातीला ९७ विषय — आता — १०० → सध्या (९२ व ९२ बी (३)) — ९८
९२ ए. २ ए व ९२ ए व ९२ बी चा समावेश ३३ वगळले

→ राज्य सूचीतील विषयावर कायदे करण्याचा अधिकार सामान्य परिस्थितीत राज्याला.
सार्वजनिक सुव्यवस्था, पोलीस, सार्व आरोग्य व स्वच्छता, कृषी, तुरुंग, स्थानिक सरकार
मत्स्योद्योग, बाजारपेठ, चित्रपट, नाट्यगृहे, जुगार असे ५९ विषय (सुरुवातीला ६६)
(११, १९, २०, २९, ३६) ५२ व ५५

Scanned by CamScanner

→ समवर्ती सूचीतील विषयावर कायदे करण्याचा अधिकार- दोघांना
फौजदारी कायदे आणि प्रक्रिया, दिवाणी प्रक्रिया, विवाह, घटस्फोट, लोकसंख्या नियंत्रण, कुटुंबनियोजन, विद्युत, कामगार कल्याण, आर्थिक आणि सामा. नियोजन, औषधे, वृत्तपत्रे, पुस्तके, मुद्रणालये.
सुरुवातीला ४७ विषय — ४२वी घ.दु. १९७६ नुसार राज्यसूचीतील ५ विषय समाविष्ट
सध्या ५२ विषय
पाच विषय - ① शिक्षण ② वने ③ वजन व मापे ④ वन्य पशुपक्षी संरक्षण ⑤ न्यायप्रशासन
वरील तीनही सूचित नमुद न करण्यात आलेल्या विषयावर कायदा करण्याचा अधिकार- संसद
शेष

वाद

केंद्रसूची × राज्यसूची ⟶ केंद्र सूची
केंद्र सूची × समवर्ती सूची ⟶ केंद्र सूची
राज्य सूची × समवर्ती सूची ⟶ समवर्ती सूची.

② राज्यविषयावर संसदेचे कायदे

① जेव्हा राज्यसभा तसा ठराव करते.
② राष्ट्रीय आणिबाणीच्या काळात
③ जेव्हा राज्य विनंती करते
④ आंतरराष्ट्रीय करार — अंमलबजावणी
⑤ राष्ट्रपती राजवट काळात

## प्रशासनिक संबंध

भाग ११ वा कलम २५६ ते २६३

① कार्यकारी अधिकाराचे विभाजन

* संसदेच्या अधिकारक्षेत्रातील
* राज्यविधिमंडळाच्या अधिकारक्षेत्रातील
* समवर्ती सूचीतील किंवा सर्व सूची व्यतिरिक्त

② राज्ये आणि केंद्र यांच्यावरील बंधने

* संसदेने केलेले कायदे व राज्याला लागू असलेले सध्याचे कायदे यांचे पालन सुनिश्चित करणे
* राज्यातील केंद्राच्या कार्यकारी अधिकारांना बाधा न आणणे

③ ~~केंद्र व राज्य यांच्यात~~

## केंद्र व राज्यातील सहकार्य

① आंतरराज्यीय नदी, नदी खोरे यांच्यातील पाण्याचा वापर व वाटप यासंबंधी संसद नमुद करू शकते.

Scanned by CamScanner

② समान हितांच्या विषयांचा अभ्यास करण्यासाठी राष्ट्रपती आंतरराज्यीय परिषद स्थापन करू शकतो. ( कलम २६३)

* अखिल भारतीय सेवा :

① भारतीय प्रशासकीय सेवा.
② भारतीय पोलीस सेवा
③ भारतीय वन सेवा.

} भरती आणि प्रशिक्षण केंद्रामार्फत काम केंद्र व राज्यात दोन्हीकडे.
दैनंदिन नियंत्रण राज्याकडे - अंतिम नियंत्रण केंद्राकडे.

⇒ इ.स. १९४७ मध्ये भारतीय नागरी सेवेच्या जागी भारतीय प्रशासकीय सेवा (IAS) आणि भारतीय पोलीसच्या जागी भारतीय पोलीस सेवा आली.
⇒ इ.स. १९६६ मध्ये भारतीय वन सेवा निर्माण प्रशासकीय सेवा.
⇒ संसदेला नवीन अखिल भारतीय सेवा निर्माण करण्याचा अधिकार (कलम ३१२)

* लोकसेवा आयोगाच्या संदर्भात केंद्र व राज्य संबंध.

* राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष व त्यांचे सदस्य यांची नियुक्ती राज्यपालाकडून पण पदच्युती राष्ट्रपती करून.
* संबंधित राज्य विधिमंडळाच्या विनंतीवरून दोन किंवा अधिक राज्यासाठी संसद संयुक्त राज्य लोकसेवा आयोग स्थापन करू शकते (त्याच्या अध्यक्ष व सदस्य - नियुक्ती राष्ट्रपती)

एकात्मिक न्यायव्यवस्था

* सर्वोच्च न्यायालय सर्वात श्रेष्ठ त्यानंतर उच्च न्यायालये - केंद्रिय तसेच राज्य कायद्याची अंमलबजावणी.
* सर्वोच्च न्याया. सरन्यायाधीश व राज्यपाल यांच्याशी विचारविनिमय करून उच्च न्याया.च्या न्यायाधिशाची नियुक्ती राष्ट्रपती करतो - बदली करू शकतो, पदच्युत करू शकतो.
* संसद दोन किंवा अधिक राज्यासाठी एकच उच्च न्यायालय स्थापन करू शकते.

आणिबाणीच्या काळातील संबंध

राष्ट्रीय, राज्यातील (घटनात्मक), आर्थिक आणीबाणीच्या काळात केंद्राचे अधिकार वाढतात.

इतर.

① राज्यपालाची नियुक्ती राष्ट्रपती मार्फत - मर्जीअसेपर्यंत पदावर - राज्य व केंद्र यातील दुवा.
② राज्य निवडणूक आयोग आयुक्त - नियुक्ती राज्यपाल - पदच्युती राष्ट्रपती.

आर्थिक संबंध

राज्यघटनेचा भाग - १२ कलम २६८ ते २९३ - केंद्र व राज्य यातील आर्थिक संबंधाविषयी.

कर आकारण्याच्या अधिकाराची विभागणी.

① केंद्र सूचीत दिलेल्या विषयावर कर आकारण्याचा अधिकार केंद्राला (विषय १५)

Scanned by CamScanner

② राज्य सूचीतील विषयावर कर आकारण्याचा अधिकार → राज्याला (विषय २०)
③ समवर्ती सूचीतील ——————— " ——————— दोघांसाठी (विषय 3)
④ तिन्ही सूचीत नसलेल्या ——————— " ——————— केंद्राला (संपददेणगीकर, संपत्ती व व्यय)

## राज्यांच्या कर आकारण्याच्या अधिकारावर बंधने

① राज्य व्यवसाय कर आकारू शकते पण २५०० पेक्षा जास्त नसावा.
② राज्य विजेच्या विक्रीवर किंवा वापरावर कर आकारू शकते.
अपवाद – ① केंद्राने वापरलेली वीज
② केंद्राला विकलेली वीज
③ रेल्वेच्या विकासासाठी केंद्राने किंवा रेल्वे कंपनीने वापरलेली वीज.

## कर महसुलाची विभागणी

अ) केंद्राने आकारलेले पण राज्यांनी संकलित केलेले व विनियोग केलेले (कलम २६८)
① सर्व हुंडी, धनादेश, वचनपत्र, विमा पत्रे, भाग हस्तांतरण — मुद्रांक शुल्क
② उत्पादन शुल्क ⟹ मद्यार्क, सौंदर्यप्रसाधने इ.

ब) केंद्राने आकारलेला, केंद्र व राज्याने संकलित केलेला व विनियोग केलेला सेवाकर (२६८ ए)
संकलनाची व विनियोगाची तत्त्वे संसद ठरवते.

क) केंद्राने आकारलेले व संकलित केलेले पण राज्यांकडे सोपवलेले कर (२६९)
यामध्ये – ① आंतरराज्यीय व्यापार/वाणिज्यातील वृत्तपत्र सोडून इतर मालाच्या खरेदी/विक्रीकर
② ——————— " ——————— माल पाठविण्यावरील कर

ड) केंद्राने आकारलेले व संकलित केलेले पण केंद्रात व राज्यात विभागणी केले जाणारे (२७०)
खालील बाबी वगळून केंद्रसूचीतील सर्व शुल्क व कर.
① कलम २६८, २६८ ए, २६९
② कलम २७१ मध्ये नमूद केलेल्या कर व शुल्क यावरील अधिभार.

इ) केंद्राच्या उद्देशासाठी काही कर व शुल्क यावरील अधिभार (कलम २७१)
कलम २६९ व २७० वर संसद कधीही अधिभार लावू शकते. या अधिभारात राज्यांचा वाटा नसतो.

फ) राज्याने आकारलेले, संकलित केलेले व स्वतःकडे राखून ठेवलेले कर
पूर्णतः राज्याचे – संख्या – २०.
① जमीन महसूल
② शेती उत्पन्न/वारसा शुल्क
③ जमीन/इमारत/करमणूक/जुगार/इ.
④ मद्यार्क
⑤ व्यवसाय कर
⑥ देणगी शुल्क
⑦ पथकर
⑧ केंद्र सूचीतील सोडून इतर कागदपत्रावरील मुद्रांक शुल्क
⑨ वृत्तपत्राव्यतिरिक्त इतर वस्तूवरील कर

## करेतर महसुलाची विभागणी ⇒

प्रकरे स्रोत ① केंद्र ⇒ ① डाक व तार ② रेल्वे ③ बँक ④ प्रक्षेपण ⑤ टांकसाळ व चलन ⑥ सार्व. क्षेत्रातील उद्योग ⑦ सरकार जमा मालमत्ता.

② राज्ये ① सिंचन, वने, मत्स्योद्योग, ② राज्याचे सार्व क्षेत्रातील उद्योग ③ सरकार जमा मालमत्ता.

## राज्यांना अनुदान

① वैधानिक अनुदान ② ऐच्छिक अनुदान.

### वैधानिक अनुदान -

कलम २७५ ने ज्या राज्यांना आर्थिक सहाय्याची गरज आहे अशा राज्यांना अनुदान देण्याचा संसदेला अधिकार — निधी भारताच्या संचित निधीतून. हे अनुदान वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार देण्यात येते.

### ऐच्छिक अनुदान -

कलम २८२ ने कोणत्याही सार्वजनिक उद्दिष्टांसाठी (केंद्र व राज्य यांच्या कायदेविषयक अधिकार क्षेत्रातील नसले तरी) अनुदान देण्याचा केंद्र व राज्य सरकारांना अधिकार नियोजन आयोगाच्या / नीती आयोगाच्या शिफारशीनुसार — राज्यांना अनुदान असे अनुदान देणे केंद्रावर बंधनकारक नसून ऐच्छिक.

* एकूण अनुदानापैकी ऐच्छिक अनुदानाचा वाटा मोठा. - त्यामुळे वित्त आयोगापेक्षा नियोजन आयोगाला महत्व अधिक.

## वित्त आयोग

कलम - २८० — अर्धन्यायिक संस्था म्हणून तरतूद — दर ५ वर्षांनी राष्ट्रपती वित्त आयोगाची स्थापना करतो. आयोग खालील विषयावर राष्ट्रपतीला शिफारशी करतील.

① करांच्या निव्वळ उत्पन्नाची केंद्र व राज्य यांच्यात विभागणी.
② संचित निधीतून राज्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानाची तत्वे ठरवणे.
③ राज्यातील स्थानिक प्राधिकरणांच्या विकासासाठी राज्याच्या संचित निधीमध्ये वृद्धी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

## केंद्र व राज्ये यांनी कर्ज घेणे

① केंद्र सरकार भारताच्या संचित निधीचे तारण देवून किंवा हमी देवून देशातून किंवा देशाबाहेरून कर्ज घेवू शकते.
② राज्य सरकार राज्याच्या संचित निधीचे तारण देवून फक्त देशातूनच कर्ज घेवू शकते.
③ केंद्र - कोणत्याही राज्याला कर्ज देवू शकते किंवा राज्याने उभारलेल्या कर्जासाठी हमी देवू शकते

Scanned by CamScanner

१०२

असे कर्ज भारताच्या संचित निधीतून दिले जाते.

## आंतर-सरकार कर संरक्षण

① केंद्राच्या मालमत्तांना राज्य करातून सूट / स्थानिक करातून सूट.
यामध्ये जमीन, इमारती, जंगम मिळकती, भाग, भांडवल कर्ज यांचा समावेश.
केंद्राने स्थापन केलेल्या निगम किंवा कंपन्या यांना राज्य करातून किंवा स्थानिक करातून सूट नाही. कारण ती स्वतंत्र कायदेशीर संस्था.

② राज्याच्या मालमत्ता / उत्पन्नात केंद्रिय करातून सूट.
मात्र, स्थानिक प्राधिकरणांची मालमत्ता व उत्पन्न यांना केंद्राच्या करातून सूट नाही

## * केंद्र व राज्य संबंधातील आयोग किंवा समित्या *

### * प्रशासनिक सुधारणा आयोग :-

* १९६६ — अध्यक्ष मोरारजी देसाई — ६ सदस्यीय आयोग
इतर विषयांबरोबरच केंद्र-राज्य संबंध हा एक विषय. — त्यासाठी आयोगाने सेटलवाड यांच्या नेतृत्वाखाली अभ्यासगट स्थापन केला.
अहवाल - १९६९ — एकूण शिफारशी २२

① घटनेच्या कलम २६३ अनुसार आंतरराज्यीय परिषदेची स्थापना करणे.
② राज्यपाल - अनुभवी व नियुक्ती निःपक्षपातीने
③ अधिकाधिक अधिकार राज्यांकडे देणे
④ राज्यांकडे आर्थिक संसाधने देणे
⑤ राज्यात केंद्रिय सशस्त्र दल नियुक्त करणे.

या आयोगाच्या शिफारशींवर केंद्राने कोणतीही कृती केली नाही.

### * राजमन्नार समिती

* १९६९ — ता. नाडू सरकारने — पी. वी. राजमन्नार यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय
(DMK)
१९७१ — अहवाल

शिफारशी — ① आंतरराज्यीय परिषदेची स्थापना.
② वित्त आयोग कायमस्वरूपी संस्था असावी.
③ नियोजन आयोग बरखास्त करून त्या जागी वैधानिक संस्था असावी
④ ३५६, ३५७, ३६५ (आणिबाणी विषयक) वगळावी.
⑤ शेषाधिकार राज्यांना द्यावेत.
⑥ अखिल भारतीय सेवा रद्द कराव्यात.

शिफारशी कडे पूर्णत: दुर्लक्ष

Scanned by CamScanner

## आनंदपूर साहिब ठराव -

सन १९७३ – पंजाबमध्ये – आनंदपूर साहिब येथे – अकाली दल.
केंद्राकडे संरक्षण, परराष्ट्रव्यवहार, दळणवळण, व चलन इतकेच विषय असावेत
उर्वरीत विषय राज्यांकडे द्यावेत.

## प. बंगाल निवेदन पत्र

सन १९७७ – साम्यवादी पक्षाच्या नेतृत्वाखाली – निवेदन पत्र.
त्यामधील काही सूचना.

① संघराज्य शब्दाऐवजी राज्यसंघ हा शब्द असावा.
② केंद्राकडे संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, चलन, संचार, आर्थिक समन्वय हे विषय असावेत उर्वरीत राज्याकडे.
③ कलम ३५६, ३५७, ३६० रद्द करावीत.
④ नवीन राज्यांची निर्मिती किंवा पुनर्रचना करताना राज्यांची संमती बंधनकारक
⑤ केंद्राच्या एकूण महसुलापैकी ७५% महसूल राज्यांसाठी असावा.
⑥ राज्यसभेला लोकसभेच्या समान अधिकार असावेत.

## सरकारिया आयोग

सन १९८३ – सर्वोच्च न्याया. चे निवृत्त न्यायाधीश आर. एस. सरकारिया यांच्या अध्यक्षतेखाली.
अहवाल १९८७
सध्याची व्यवस्था ~~सह~~ सुयोग्य असून संरचनात्मक बदल करण्याची आवश्यकता नाही
कायनिक व व्यवहारात्मक बाबी मध्ये बदलाची आवश्यकता.
एकूण शिफारशी - २४७.

① आंतरराज्य परिषद स्थापन करणे.
② क्वचीत प्रसंगी ३५६ चा वापर
③ अखिल भारतीय सेवा अधिक प्रबळ कराव्यात.
④ राष्ट्रीय विकास परिषदेचे नाव बदलून राष्ट्रीय अर्थ व विकास परिषद करावे.
⑤ समवर्ती सूचीतील विषयावर कायदे करताना राज्यांना विश्वासात घ्यावे.
⑥ अपरिहार्य कारणांशिवाय राज्यपालांच्या ५ वर्षाच्या कार्यकाळात बदल करू नये.
⑦ त्रिभाषा सूत्र समान पद्धतीने अमलात आणण्यासाठी उपाययोजना करावी.

केंद्राने १८० शिफारशी स्विकारल्या.
१९९० मध्ये आंतरराज्यीय परिषदेची स्थापना – प्रथ.

Scanned by CamScanner

## पंछी आयोग

२०००- भारताचे माजी मुख्य न्यायमूर्ती - मदन मोहन पंछी.
केंद्र-राज्य संबंधावरील दुसऱ्या आयोग.

आयोगाचे इतर चार सदस्य

① धिरेंद्र सिंग - (भारत सरकारचे माजी सचिव)
② विनोदकुमार दुग्गल ———॥———
③ एन आर माधव मेनन (राष्ट्रीय न्यायिक प्रबोधिनी, भोपाळ मा. संचालक)
④ अमरेश बागची (प्राध्यापक, सार्व वित्त व धोरण संस्था दिल्ली)
↳ (याच्या मृत्यूनंतर विजय शंकर - २००८ पासून)

एकूण शिफारशी ३१०

① समवर्ती सूचीच्या कायदे निर्मिती संदर्भात केंद्र व राज्य यांच्यात मतैक्य हवे
② समान अधिकार क्षेत्र असलेले विषय फक्त संघराज्यानेच सांभाळावे.
③ राज्यपालाचा कार्यकाळ ठराविक ५ वर्षांचा असावा. (सरकारच्या मर्जीनुसार त्यांना पदच्युत करू नये)
④ राज्यपालाला पदच्युत करण्यासाठी महाभियोगाची प्रक्रिया असावी.
⑤ राज्य विधीमंडळाने संमत केलेल्या विधेयकाबाबत राज्यपालाने सहा महिन्यात निर्णय घेवून त्याला मान्यता द्यावी.
⑥ राज्यपाल विद्यापीठाचे कुलगुरू असण्याची प्रथा रद्द करावी.
⑦ कलम ३५२ व ३५६ चा वापर फक्त शेवटचा पर्याय म्हणून केला जावा.
⑧ आरोग्य, शिक्षण, अभियांत्रिकी व न्यायव्यवस्था यासाठी अखिल भारतीय सेवा निर्माण कराव्यात.
⑨ वित्त आयोगाचे विषयक्षेत्र निश्चित करण्यासाठी राज्यांना सहभागी करून घेण्यासाठी प्रभावी यंत्रणा असावी

### केंद्र व राज्ये कायदे विषयक संबंधाविषयी कलमे:

२४५ ⇒ संसद आणि राज्य विधिमंडळांनी केलेल्या कायद्याची व्याप्ती.
२५० ⇒ आणीबाणीची घोषणा लागू असल्यास राज्य सूचीतील विषयाबाबत कायदे करण्याचा संसदेला अधिकार
२५२ ⇒ दोन किंवा अधिक राज्यांच्या संमतीने कायदे करण्याचा संसदेचा अधिकार.
२५३ ⇒ आंतरराष्ट्रीय कराराची अंमलबजावणी करण्यासाठीचे कायदे.

### प्रशासकिय संबंधाविषयी

२५८ए ⇒ २६ = सशस्त्र दले किंवा इतर दले पाठवून राज्यांना साहाय्य करणे.
२६० - भारताबाहेरील क्षेत्राबाबत संघराज्याचे अधिकारक्षेत्र.
२६२ - आंतरराष्ट्रीय नद्या व नदी खोरी यांच्या पाणीवाटपासंबंधीत विवादांचा न्यायनिवाडा.

Scanned by CamScanner

२६३ – आंतरराज्यीय परिषदेसंबंधी तरतुदी.

## केंद्र व राज्य आर्थिक संबंधाविषयी कलमे.

२७५ · संघराज्याचे काही राज्यांना अनुदान.
२७६ – व्यवसाय, व्यापार, उपजिवीका आणि नोकरी यांवर कर.
२८० – वित्त आयोग
२८१ – वित्त आयोग – शिफारशी.
२९१ – संस्थानिकांचे तनखे रद्द करणे.
२९२ – केंद्राचे कर्ज
२९३ – राज्यांची कर्जे.

Scanned by CamScanner